डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
**कृषि विज्ञान केंद्र, वर्धा (सेलसुरा)**
पो.सेलसुरा जि.वर्धा

डॉ.जिवन कतोरे
कार्यक्रम समन्वयक

भ्रमणध्वनी क्र.८२७५४१२०१२
इ मेल - kvk.wardha@gmail.com
kvkselsura@pdkv.ac.in

जा.क्र.कृविके/सेल/568/२०२२ दिनांक19/08 /२०२२

दरपत्रक मागणी पत्र

प्रती

१...............................................

२...............................................

३...............................................

४...............................................

५...............................................

विषय :- कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा या कार्यालयामार्फत आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये आयोजीत विविध प्रशिक्षण व कार्यक्रमाकरीता जेवण, चहा, व नास्ता (फराळ) करीता दर पुरविण्याबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि. वर्धा येथे मा.संचालक, अटारी, पुणे यांचे प्राप्त निर्देशानुसार विविध विषयांचे प्रशिक्षण कार्यक्रम, कृषि मेळावे (खरीपपूर्व, रब्बीपूर्व ), कृषि तंत्रज्ञान सप्ताह, विषयानुरुप विविध प्रशिक्षणे, प्रायोजीत प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, शिवारफेरी, शास्त्रीय सल्लागार समिती सभा, राष्ट्रीय कृषि विकास योजना (आर.के.व्ही.वाय) कौशल्य आधारीत ग्रामीण युवकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम (एस.टी.आर. वाय), राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान इ.विस्तार कार्यक्रमाचे आयोजन होत असते. सदर प्रशिक्षण व तांत्रिक कार्यक्रमाकरीता कमीत कमी १५ ते २०० किंवा जास्त लाभार्थी हजर राहू शकतात. तरी त्यांचे भोजन व्यवस्थेकरीता आपणाकडून सन २०२२-२३ या आर्थीक वर्षासाठी खालील प्रमाणे अटींवर दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी अटी मान्य असल्यास दरपत्रक सादर करावे.पुढे नमुद केलेल्या विवरणासाठी आपले दरपत्रक पाठवावे हि विनंती.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विवरण</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>मर्यादित अल्प भोजन :<br>भाकर + पिठलं / भाकर + भरीत / मसाले भात + कढी / पुरी + भाजी इ.</td><td rowspan="5">सेलसुरा साठी व काम पडल्यास सेलसुरा च्या बाहेर दोन्ही साठी दर द्यावेत.</td></tr>
<tr><td>२</td><td>साधे जेवण :<br>वरण + भात+ भाजी + पोळी + सलाद / कोथींबीर + चटणी + मीठ इ.</td></tr>
<tr><td>३</td><td>स्पेशल जेवण :<br>वरण + भात+ भाजी (३) + पोळी + एक स्वीट डिश (मर्यादित)+ पापड + भजे + लोणचे + सलाद + मिठ इ.</td></tr>
<tr><td>४</td><td>डिलक्स जेवण :<br>दाल फ्राय + जिरा राईस + भाजी (३) + पुरी / पोळी + एक स्वीट डिश (मर्यादित)+ दही + पापड + भजे + लोणचे + सलाद + मिठ + कढी / मठ्ठा.+ फरसाण इ.</td></tr>
<tr><td>५</td><td>सुपर डिलक्स जेवण :<br>सुप + दाल फ्राय + जिरा राईस + भाजी (३) + पुरी / पोळी + एक स्वीट डिश (अमर्यादित)+ दही + पापड + भजे + लोणचे + सलाद + मिठ + कढी / मठ्ठा.+ फरसाण इ.</td></tr>
</table>

कृपया दर नमुद करतांना खालील दिलेल्या सुचना काळजीपूर्वक लक्षात घ्याव्यात

१. दरपत्रक बंद पाकीटात पाठवावेत.
२. दरपत्रकाच्या पाकिटावर पुढीलप्रमाणे नमुद करावे जेवण व चहापाणी पुरविण्यासाठी दरपत्रक आपले संदर्भांकिंत चौकशी पत्रक जा.क्र.कृविके/सेलसुरा/ /२०२२ दि. /०८/२०२२
३. दरपत्रक पोहोचविण्याची अंतीम तारीख व पत्ता दि. /०८/२०२२ रोजी दुपारी ५:०० वाजेपर्यंत वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा येथे पोहोचणे आवश्यक आहे.
४. जेवण, चहा व नास्ता (फराळ) पुरवठाधारकांकडे अन्न व औषध प्रशासनाचा परवाना असणे बंधनकारक आहे.
५. देयक / बिल हे GST क्रमांकासह असणे बंधनकारक आहे.
६. जेवण चांगले व स्वच्छ प्रतिचे असणे बंधनकारक आहे.
७. दोन वेळचा चहा, पाणी व भोजन वाढण्याची जबाबदारी आपली स्वत:ची राहील याची नोंद घ्यावी.
८. सदर कार्यक्रमांकरीता कमीत कमी १५ ते २०० किंवा जास्त लाभार्थी हजर राहू शकतात त्यामुळे आवश्यकतेप्रमाणे कार्यक्रमात जेवण, चहा व नास्ता (फराळ) पुरविण्यात येणे बंधनकारक आहे.
९. पिण्याच्या पाण्याची सोय करणे बंधनकारक राहील.

वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख,
कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा

**वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख**
**कृषी विज्ञान केंद्र,सेलसुरा**
**जि.वर्धा**